# दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर जि. सोलापूर

## विशेष सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांकरिता)

बँकेचे सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपले बँकेची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार दि.२१/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता बँकेचे कर्मयोगी सभागृह, शाखा नवीपेठ, पंढरपूर येथे आयोजित केलेली आहे. या सभेत खालील विषयांवर विचार विनीमय होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

*** सभेपुढील विषय ***

१. बँकेच्या उपविधीमध्ये सुचिवलेल्या दुरूस्तीबाबत विचार करून मान्यता देणे. (मे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मान्यतेस अधीन राहून) २. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार अनुत्पादित कर्जखात्यांवर वसुलीचा हक्क व हितसंबंध अबाधित ठेवून खाते निर्लेखित करणेस मान्यता देणे. ३. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्राच्या बाहेर विस्तारीत करणेसाठी मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी ॲक्ट २००२ प्रमाणे बॉयलॉज स्विकृत करणे व बहुराज्यीय बँकेत रूपांतर करणेचा प्रस्ताव केंद्रीय निबंधक, नवी दिल्ली यांचेकडे दाखल करणे व त्या संबंधीचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे.

याशिवाय, मा. अध्यक्षांचे परवानगीने आयते वेळी येणारे विषयांचा विचार करणे.

पंढरपूर
दिनांक : २८/०२/२०२६

मा. संचालक मंडळाचे आदेशावरून,
श्री. उमेश रामचंद्र विरधे
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**विशेष सूचना :**

सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी ११.३० वाजेपर्यंत झाली नाही तर ती सभा तहकूब केली जाईल. अशी तहकूब केलेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठिक १२.०० वाजता मुळ सभेच्या विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडणेसाठी भरेल. त्यासाठी नियमानुसार गणसंख्या आवश्यक असणार नाही. सभासदांनी सभेस येताना किमान एक ओळखपत्र घेवून येणे आवश्यक आहे, अन्यथा प्रवेश देता येणार नाही.